# ठाणे महानगरपालिका,ठाणे

जाहिरात

ठाणे महानगरपालिकेच्या प्रधानमंत्री आवास योजनेकरीता कंत्राटी पध्दतीने एकत्रित वेतनावर नियुक्तीकरिता जाहिरात क्र. ठामपा/पिआरओ/स्मार्ट सिटी /७२८/२०१७-१८, दि. ४/१०/२०१७ अन्वये दि. ५/१०/२०१७ रोजी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती. तथापि, मार्गदर्शक सूचनांमध्ये बदल झाल्यामुळे व पात्रताधारक उमेदवार उपलब्ध न झाल्यामुळे या पदांकरिता पुनःश्च जाहिरात प्रसिध्द करण्यात येत आहे.

या पदांकरिता खालील प्रमाणे सुधारित अर्हतेची पुर्तत करणाऱ्या पात्र उमेदवारांकडून फक्त pmayrecruitment@gmail.com या ई-मेल आयडीवर दिनांक २१/०३/२०१८ ते दिनांक ३१/०३/२०१८ पर्यंत अर्ज मागविण्यात येत आहेत.

**<u>प्रधानमंत्री आवास योजना (शहरीय तांत्रिक कक्ष) अंमलबजावणीसाठी भरावयाची कंत्राटी पदे.</u>**

| अ क्र | पदाचे नाव | पद संख्या | शैक्षणिक पात्रता | अनुभव | एकत्रित वेतन रुपये |
|---|---|---|---|---|---|
| १ | माहिती व्यवस्थापन तज्ञ (MIS specialist) (Information and Technology) | ०१ | पदवी-संगणकीय विज्ञान / माहिती तंत्रज्ञान | १. शासकीय / निमशासकीय / स्वायत्त संस्था / नामांकित खाजगी कंपनी कार्यालयातील कमीत कमी २-३ वर्षाचा कामाचा अनुभव.<br>२. खाजगी क्षेत्रातील अनुभव : जर शासकीय / निम शासकीय कार्यालयासोबत काम केलेले असल्यास अनुभवास प्राधान्य.<br>३. संगणकीय प्रणाली निर्मिती, विकास आणि माहिती व्यवस्थापन प्रणाली हाताळणी अनुभव.<br>४. शासकीय संस्थेचा कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य.<br>५. उच्च शिक्षित उमेदवारास प्राधान्य. | रु. ५०,०००/- प्रति माह |
| २ | शहर / नगर रचनाकार तज्ञ (Town Planner) | ०१ | पदवी शहरी नियोजन / प्रादेशिक नियोजन किंवा भूगोल | १. कमीत कमी २-३ वर्षाचा शहर रचनाकार कामाचा अनुभव विशेषत: शहर सुविधा/ इन्फ्रास्ट्रक्चर प्रकल्पांचा अनुभव / परवडणारी घरे / झोपडपट्टी पुर्नविकास प्रकल्पांचा अनुभव.<br>२. खाजगी क्षेत्रातील अनुभव : जर शासकीय / निम शासकीय कार्यालयासोबत काम केलेले असल्यास प्राधान्य.<br>३. सुधारणावादी प्रकल्प अमंलबजावणीचा अनुभवास प्राधान्य,<br>४. शासकीय संस्थेचा कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य. | रु. ५०,०००/- प्रति माह |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | ५. उच्च शिक्षित उमेदवारास प्राधान्य. | |
| ३ | क्षमता बांधणी आणि संस्थीय प्रशिक्षण तज्ञ (Capacity Building and Institutional Training Specialist ) | ०१ | पदवी शहर विकास / समाज विकास | १. कमीत कमी २-३ वर्षाचा क्षमता बांधणी व संस्थीय प्रशिक्षणाचा अनुभव,<br>२. खाजगी क्षेत्रातील अनुभव : जर शासकीय / निम शासकीय कार्यालयासोबत काम केलेले असल्यास प्राधान्य.<br>३. शासकीय / निमशासकीय कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य.<br>४. प्रौढ शिक्षण तंत्र व क्षमता बांधणी कौशल्ये, शहर विकास प्रकल्पाचा अनुभव,<br>५. क्षमता बांधणी तपासणी, मूल्यांकन, अभ्यासक्रम निर्मिती, अभ्यासक्रम संस्थीय प्रशिक्षण आणि क्षमता परिणाम / प्रमाण मूल्यांकनाचा अनुभव आवश्यक. | रु. ५०,०००/- प्रति माह |
| ४ | आर्थिक तज्ञ (Financial Specialist) | ०१ | पदवी मान्यतप्राप्त विद्यापीठातून वित्त व्यवस्थापन / समकक्ष पात्रता | १. कमीत कमी २-३ वर्षाचा गृहनिर्माण वित्तीय व्यवस्थापन / बँकींग क्षेत्रातील / गृहनिर्माण धोरणात्मक कामांचा अनुभव.<br>२. खाजगी क्षेत्रातील अनुभव : जर शासकीय / निम शासकीय कार्यालयासोबत काम केलेले असल्यास प्राधान्य<br>३. राज्य / केंद्रीय सरकारी कामांचा अनुभव तथा स्थानिक स्वराज्य संस्थाचा कामांचा अनुभव, विविध विकल्प गृहनिर्माण वित्तीय व्यवस्थापन, शहर विकास, गुंतवणूक व प्रकल्प अमंलबजावणीचा आढावा व विकल्प देण्याच अनुभव आवश्यक. | रु. ५०,०००/- प्रति माह |

**अटी व शर्ती :-**

१. उपरोक्त पदांसाठी सर्व प्रवर्गातील उमेदवारांचे वय अर्ज स्वीकृतीच्या अंतिम दिनांकास किमान १८ वर्षे पूर्ण असणे आवश्यक आहे. तसेच शासन निर्णय क्र.एसआरव्ही २०१५/प्र.क्र.४०४/कार्या १२, दि.२५/०४/२०१६ नुसार खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा ३८ वर्षे व मागासवर्गीय उमेदवारांसाठी ४३ वर्षे इतका राहिल. शासनाच्या नियमानुसार आरक्षणाची तरतूद नमूद आहे.

२. सदरची नेमणूक ही करार (कंत्राटी) पध्दतीने असल्यामुळे त्यांना शासकीय कर्मचारी म्हणून कोणतेही फायदे अनुज्ञेय होणार नाहीत.

३. उपरोक्त तक्त्यामधील नमूद असलेली सर्व पदे ही ११ महिन्यांच्या कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने भरण्यात येतील. सदरचा कालावधी हा उमेदवाराचा वर्षाच्या कामाच्या मूल्यमापन अहवालावरुन ठरविण्यांत येईल. उमेदवाराचे काम समाधानकारक नसल्यास त्याची कंत्राटी पध्दतीने असलेली नेमणूक रद्द करण्याचा अधिकार प्राधिकरण राखून ठेवत आहे. उमेदवाराची नेमणूक रद्द करण्यापूर्वी उमेदवारास १ महिन्यांची आगाऊ सूचना देण्यांत येईल.

४. उमेदवाराना मराठी, इंग्रजी व हिंदी भाषापैकी किमान दोन भाषेचे ज्ञान असणे आवश्यक, पैकी इंग्रजी अनिवार्य.
५. निवड झालेल्या उमेदवारास नियुक्ती / मुदत वाढ देताना त्यांचेकडून विहीत नमुन्यात करारनामा लिहून घेण्यात येईल.
६. उमेदवाराची नियुक्ती कोणत्याही प्रकारची पूर्व सूचना न देता रद्द करण्याचा अधिकार ठाणे महानगरपालिका राखून ठेवत आहे.
७. जाहिरातीमध्ये प्रसिद्ध केलेल्या पदामध्ये व मासिक वेतनामध्ये बदल करण्याचे अधिकार महानगरपालिका यांनी राखून ठेवलेले आहेत.
८. उमेदवाराने ज्या पदासाठी अर्ज केला आहे, त्या पदाचा अर्जामध्ये स्पष्टपणे उल्लेख करणे आवश्यक आहे. अर्जाचा नमुना www.thanecity.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
९. अर्जासोबत प्रमाणपत्राच्या स्वसाक्षांकित सत्य प्रती तसेच पासपोर्ट आकाराचा फोटो स्कॅन करुन pmayrecruitment@gmail.com या ई-मेलवर देण्यात याव्यात. (जन्मतारीखेचा पुरावा, शैक्षणिक पात्रतेची प्रमाणपत्र व मूळ पत्रांच्या स्वसाक्षांकित सत्यप्रती (Mark Sheet) मार्कशिट, अनुभव आणि शासन निर्णयानुसार जातीचा दाखला)
१०. निवड व नियुक्ती बाबत सर्व प्रकारचा पत्रव्यवहार हा pmayrecruitment@gmail.com या ई-मेल द्वारेच करण्यात येईल.
११. सदर उमेदवारांना महानगरपालिका सेवेत कोणताही हक्क सांगता येणार नाही.
१२. दिनांक ३१/०३/२०१८ नंतर प्राप्त झालेल्या, अपूर्ण असलेले अर्ज, विहीत नमुन्यात नसलेल्या अर्जांचा कोणत्याही परिस्थितीत विचार केला जाणार नाही.

(सुनील चव्हाण भा.प्र.से.)
अतिरिक्त आयुक्त - १, ठाणे मनपा. तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
ठाणे स्मार्ट सिटी लि.

**अर्जाचा नमुना**

**-------------------------** या पदासाठी अर्ज

उमेदवाराचा
फोटो

प्रति,
मा. अतिरिक्त आयुक्त - १,
ठाणे महानगरपालिका, ठाणे

संपूर्ण नावः -----------------------------------------------------------------------------------------------

पत्रव्यवहाराचा पत्ता :-------------------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------------

दूरध्वनी/भ्रमणध्वनी क्र.-------------------------------------------------------------------------------------------

ईमेल आयडी______________________________________________________________

जन्मतारीख

| तारीख | महिने | वर्ष |
|---|---|---|
| | | |

दि. २१/०३/२०१८ रोजीचे वय

| दिवस | महिने | वर्ष |
|---|---|---|
| | | |

लिंग :- पुरुष स्त्री

राष्ट्रीयत्व :- मातृभाषा :-

**जात:-** **जातीचा प्रवर्ग:-** **जात वैधता प्रमाणपत्र** (आहे/नाही):-

सरकारी / निम सरकारी कर्मचारी (आहे / नाही) (असल्यास ना हरकत प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.)

**शैक्षणिक अर्हता :-**

| **उत्तीर्ण केलेली परिक्षा** | **विद्यापीठ/मंडळाचे नाव** | **उत्तीर्ण झाल्याचे वर्ष** | **मिळालेले गुण** | **एकुण गुण** | **टक्केवारी/श्रेणी** |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

**अनुभवः-**

| **संस्थेचे नाव** | **पदनाम** | **कालावधी** | | **अनुभव प्रमाणपत्र जोडले आहे / नाही** |
|---|---|---|---|---|
| | | वर्ष | महिने | |
| | | | | |
| | | | | |

उमेदवारास पुर्वी फौजदारी अथवा दिवाणी प्रकरणात शिक्षा झाली होती का? किंवा सद्यस्थितीत त्यांचेवर फौजदारी अथवा दिवाणी गुन्हा दाखल आहे का? असल्यास तपशील लिहावा. -------------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------------------------------------------------

ठिकाण : ठाणे                                                            अर्जदाराची सही

दिनांकः          /          /२०१८                                                            (अर्जदाराचे नांव)

---

महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम २००५ नुसार
अर्जासोबत जोडावयाच्या लहान कुटुंबाच्या प्रतिज्ञापनाचा नमुना
प्रतिज्ञापन

नमुना अ (नियम ४ पहा)

मी.श्री/श्रीमती/कुमारी ------------------------------------------------------------------------------------------------

श्री. -------------------------------------------------------------------- यांचा/यांची/मुलगा/मुलगी/पत्नी, वय--------- वर्ष

राहणार ---------------------------------------------------------------------- याद्वारे पुढीलप्रमाणे असे जाहीर करतो/करते की,

१. मी ------------------------------------------------------------------------- या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

२. आज रोजी मला ------------------ (संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दिनांक २८ मार्च २००५ नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या --------------- आहे. (असल्यास, जन्मदिनांक नमूद करावा.)

३. हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च २००६ व तद्नंतर जन्माला आलेल्या मुलामुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईन याची मला जाणीव आहे.

स्थळ (---------------------)

दिनांक : अर्जदाराचे सही

मी या अन्वये प्रतिज्ञापूर्वक असे जाहिर करतो/करते की, वरील माहिती जाणीवपूर्वक तसेच विश्वासपूर्वक दिली असून ती खरी आहे. जाहिरातीत दिलेल्या सर्व निकषांनुसार व शैक्षणिक अर्हतेनुसार ती पात्र आहे. त्यापैकी कोणतीही माहिती खोटी आढळल्यास माझा अर्ज फेटाळून लावल्यास किंवा निवडीच्या कुठल्याही टप्प्यावर माझी उमेदवारी रद्द केल्यास त्यांबाबत माझी कोणतीही तक्रार राहणार नाही.

आपला/आपली विश्वासू

ठिकाण : ठाणे अर्जदाराची सही

दिनांकः / /२०१८ (अर्जदाराचे नांव)

स्थानिक पोलिस स्टेशनचा पत्ता :-